**MHNS240017082017**

दाखल तारीख : ०६/११/२०१७

नोंदणी तारीख : ०६/११/२०१७

निकाल तारीख : ०५/०५/२०२६

कालावधी : वर्षे महिने दिवस

०८ ०५ २९

निशाणी क्रमांक **४६/ब**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सटाणा, जि.नाशिक यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी सी.यु.शिपकुले)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२३५/२०१७**

प्रथम खबर क्र.११०/२०१७, पोलीस ठाणे सटाणा

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष/फिर्यादी | महाराष्ट्र सरकार तर्फे पोलिस ठाणे सटाणा<br>ता. सटाणा, जि.नाशिक. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. एस.आर. गायकवाड. |
| आरोपी | **०१. ठाणसींग देवसींग मोरकर,** वय–६४,<br>**०२. धनसींग देवसींग मोरकर,** वय–५६<br>दोन्ही रा. कौतिकपाडे, ता. सटाणा, जि.नाशिक. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. सी. एन. पवार |
| घटना तारीख | २६/०६/२०१७ |
| प्रथम खबर तारीख | २६/०६/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०६/११/२०१७ |
| आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित तारीख | ०१/०८/२०१८ |
| पुरावा चालु तारीख | ०४/०२/२०१९ |
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | नाही |
| न्यायनिवाडा तारीख | ०५/०५/२०२६ |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोप निश्चित केलेले कलम | निर्दोष मुक्ता केले का दोषारोप सिध्द झाले | शिक्षा | शिक्षेची वजावट झालेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ठाणसींग देवसींग मोरकर | ०५/०७/२०१७ | ०५/०७/२०१७ | भा.द.वि. कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०१ | धनसिंग देवसींग मोरकर | ०५/०७/२०१७ | ०५/०७/२०१७ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |

### अ– अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | नानाजी सोनु दातरे | पंच |
| सा.क्र.०२ | भुषण पौलाद पवार | फिर्यादी |
| सा.क्र.०३ | कैलास त्रंबक खैरनार | तपासी अधिकारी |
| सा.क्र.०४ | योगेश कुंडलिक दातरे | साक्षीदार |
| सा.क्र.०५ | डॉ. नामदेव सालु बंगर | वैद्यकिय अधिकारी |
| सा.क्र.०६ | समाधान दौलत पवार | साक्षीदार |
| सा.क्र.०७ | पौलाद दामु पवार | साक्षीदार |

### अ– आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## अ– न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र**

अ. अभियोगपक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | १९ | फिर्याद–सा.क्र.०२ |
| ०२. | २१ | लेखी आदेश |
| ०३. | २२ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४. | २३ | मुद्देमाल पावती |
| ०५. | २९ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

आरोपीतर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही. |

न्यायालयातर्फे –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

मुद्येमाल –

| अ.क्र. | आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**<u>न्यायनिर्णय</u>**

(दिनांक ०५/०५/२०२६ रोजी घोषीत)

उपरोक्त आरोपींचे विरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे (संक्षिप्तपणे 'भा.दं.वि.सं') कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपावरुन संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

**<u>अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे</u> –**

०२. फिर्यादी भुषण पौलाद पवार हे दि.२६/०६/२०१७ रोजी सायं.०४.०० वाजताच्या सुमारास दळण दळणेसाठी गावातील महाराणा प्रताप पुतळ्याजवळ जात असतांना आरोपी तेथे उभे होते. आरोपींनी त्यांना आवाज देवुन त्यांच्याजवळ बोलावुन घेवुन 'तुझा चुलत भाऊ समाधान कुठे गेला आहे, तुला माहित आहे तो कुठे आहे, तु दौलतला रिपोर्ट देतो' असे म्हणुन कुरापत काढुन आरोपी क्र.०१ ने बाजुला पडलेल्या काठीने त्यांच्या पाठीवर मारले व आरोपी क्र.०२ ने त्यांना हाताचे चापटीने तोंडावर मारहाण केली. त्यामुळे त्यांना मुकामार लागुन दुखापत झाली. त्यानंतर आरोपी क्र.०१ ने बाजुला पडलेला दगड त्यांना मारल्याने त्यांचे डोके फुटले. त्यावेळी तेथे जमलेल्या योगन पुंडलीक दातरे, भैय्या मामा, अनिल पवार यांनी त्यांचे भांडण सोडवले. त्यानंतर त्यांनी सटाणा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. सदर फिर्यादवरुन सटाणा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.११०/२०१७ अशी नोंद घेण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी पो.हा./२१४२ के.टी. खैरनार यांनी करुन आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

०३. माझे मान्यवर पुर्व पिठासिन आधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.१० वर भारतीय दंड विधान, १८६० कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप नोंदविला. आरोपीने नि.क्र.११ व १२ अन्वये गुन्हा कबूल नसल्याचे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नि.क्र.३४ व नि.क्र.३५ कडे नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांचेविरुध्द केलेले आरोप नाकारुन खोटी केस केली असल्याचा बचाव घेतलेला आहे. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर. गायकवाड व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.सी. एन. पवार यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी, खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | आरोपींनी संगनमताने दि.२६/०६/२०१७ रोजी, सायं. ०४.०० वाजेच्या सुमारास, मौजे कौतिकपाडे येथे महाराणा प्रताप पुतळ्याजवळ मोकळ्या जागी आरोपी क्र.०१ ने फिर्यादीच्या डोक्यावर व पाठीवर काठीने व दगडासारख्या घातक शस्त्राने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय? | **नाही.** |
| ०२. | आरोपींनी संगनमताने वरील तारखेस, वेळी व ठिकाणी फिर्यादीस शिवीगाळ करुन शांतता भंग करण्यास प्रक्षोभित केले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५०४ अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय ? | **नाही.** |
| ०३. | आरोपींनी संगनमताने वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५०६ अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय ? | **नाही** |
| ०४. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त केले.** |

**:: कारणमिमांसा ::**

**०४.** अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी एकुण सात साक्षीदार तपासले. पंच नानाजी सोनू दातरे (सा.क्र.०१) यांचा पुरावा नि.क्र.१३ कडे, फिर्यादी भुषण पौलाद पवार (सा.क्र.०२) यांचा पुरावा नि.क्र.१८ कडे, तपासी अधिकारी कैलास त्रंबक खैरनार (सा.क्र.०३) यांचा पुरावा नि.क्र.२० कडे, साक्षीदार योगेश कुंडलिक

दातरे (सा.क्र.०४) यांचा पुरावा नि.क्र.२५ कडे, वैद्यकिय अधिकारी डॉ. नामदेव सालु बंगर (सा.क्र.०५) यांचा पुरावा नि.क्र.२८ कडे, साक्षीदार समाधान दौलत पवार (सा.क्र.०६) यांचा पुरावा नि.क्र.३१ कडे व पौलाद दामु पवार (सा.क्र.०७) यांचा पुरावा नि.क्र.३२ कडे नोंदविला आहे. अभियोगपक्षाने पुराव्याकामी फिर्याद नि.क्र.१९, लेखी आदेश नि.क्र.२१, घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२२, मुद्देमाल पावती नि.क्र.२३, जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र.२९ कडे सादर करुन पुरसीस नि.क्र.३३ नुसार त्यांचा पुरावा बंद केला आहे.

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ करीता–**

**०५.** भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४, ५०६ नुसार दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपींनी फिर्यादीला काठीने व दगडाने मारहाण करुन दुखापत पोहोचविली, तसेच त्यांना शिवीगाळ व फौजदारीपात्र धाकदपटशा केला.

**०६.** फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेपलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दिला जातो.

**०७.** पंच नानाजी दातरे (सा.क्र.०१) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरिता बोलविले नाही. पंचनामा त्यांच्यासमक्ष तयार केला नाही व त्यावर त्यांची सही नाही. योगेश दातरे (सा.क्र.०४) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, ते आरोपी व फिर्यादीला ओळखतात. दि.२६/०६/२०१७ रोजी काय घटना घडली होती हे त्यांना माहित नाही. सदर पंच (सा.क्र.०१) व (सा.क्र.०४) यांनी त्यांच्या जबाबाच्या विसंगत कथन केल्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांना सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामधुन अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब पटलावर आली नाही.

**०८.** फिर्यादी भुषण पौलाद पवार (सा.क्र.०२) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, आरोपींना ते ओळखत असुन दि.२६/०६/२०१७ रोजी सायं.४.०० ते

दळण्यासाठी गावामध्ये जात असतांना महाराणा प्रताप चौकासमोर आरोपी क्र.०१ ने त्यांना बोलवुन त्यांचा चुलत भाऊ समाधान दौलत पवार कुठे गेला आहे असे विचारले असता त्यांनी तो कुठे गेला आहे हे माहित नाही असे सांगितल्यावर आरोपी क्र.०२ ने त्यांना काठीने कमरेवर मारले. आरोपी क्र.०२ ने त्यांना चपलीने व दगडाने डोक्यावर मारुन दुखापत केली होती. त्यानंतर आजुबाजुच्या लोकांनी भांडण मिटवल्यावर त्यांनी आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली. त्यांना ज्या काठीने मारहाण झाली तिला पाहिल्यास ते ओळखु शकतात. फिर्यादीने उलटतपासात महाराणा प्रताप चौकात नेहमी गर्दी असते व चौकात आजुबाजुला इतर लोकांची घरे आहेत असे कबुल केले. आरोपींनी त्यांना त्यांचा भाऊ समाधान कुठे गेला आहे या व्यतिरिक्त विचारले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी आरोपींनी त्यांचा भाऊ कुठे गेला आहे हे त्यांना माहित नाही असे सांगितल्यवर आरोपींनी त्यांना मारहाण केली. आरोपी क्र.०१ ने त्यांच्या डोक्यात दगडाने मारल्यावर त्यांच्या डोक्यातुन रक्त आले व टाके पडले. रक्त हे त्यांचे शर्ट व पँटवर पडले होते. पोलीस स्टेशनला ते फिर्याद देण्यासाठी जातांना त्यांचे अंगावर रक्ताने माखलेले कपडे होते. पोलीसांना त्यांनी रक्ताने माखलेले कपडे दाखवले होते. पोलीसांनी रक्ताने माखलेले कपडे जप्त केले नाही. भांडण कोणी सोडवले त्यांची नावे ते सांगु शकत नाही असे कबुल करुन इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**०९.** तपासी अधिकारी कैलास खैरनार (सा.क्र.०३) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, दि.२६/०६/२०१७ रोजी ते सटाणा पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत होते. गु.र.क्र.१२०/२०१७ चा तपास त्यांनी केला असुन दि.२७/०६/२०१७ रोजी कौतिकपाडे गावी जावुन दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरुन फिर्यादीस मारहाण झालेला दगड हस्तगत करुन त्याबाबत मुद्देमाल पावती नोंदविली. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. तपासअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. उलटतपासात त्यांनी दि.२७/०६/२०१७ रोजी सर्व साक्षीदारांचे जबाब घेतले होते अशी कबुली देवुन इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**१०.** वैद्यकिय अधिकारी डॉ. नामदेव सालु बंगर (सा.क्र.०५) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, दि.२६/०६/२०१७ रोजी त्यांनी भुषण दौलत पवार यांची तपासणी केली. तपासणीमध्ये कपाळावर डाव्या बाजुला खरचटलेली जखम, मुका मार तसेच पाठीवर व नाकावर मुकामार लागल्याने वैद्यकिय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखमांनुसार त्यांनी वैद्यकिय प्रमाणपत्र दिले. उलटतपासात, वैद्यकिय प्रमाणपत्रावर मारहाणीबाबत नमुद नाही. प्रमाणपत्रामध्ये नमुद जखमा या खंब्याला धडक दिल्याने होवु शकतात. एम.एल.सी रजिस्टर हे योग्य फॉरमेट मध्ये नाही अशी कबुली देवुन इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

**११.** समाधान दौलत पवार (सा.क्र.०६) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, आरोपी हे त्यांच्या गावातील रहिवासी असल्याने ते त्यांना ओळखतात, त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. घटनेबाबत समजल्यानंतर ते दवाखान्यात त्यांचे चुलत भावाला पाहण्यास गेले होते. फिर्यादी व आरोपींमध्ये काय वाद होता हे त्यांना माहित नाही. तसेच पौलाद दामु पवार (सा.क्र.०७) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, सन २०१७ साली त्यांचा मुलगा व आरोपींमध्ये किरकोळ वादावादी झाली होती. याव्यतिरिक्त काही घडले नाही. पोलीसांनी तपासटिपण नोंदविले होते किंवा कसे ते त्यांना आठवत नाही. सदर दोन्ही साक्षीदार यांनी त्यांच्या जबाबाच्या विसंगत कथन केल्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांना सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामधुन अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब पटलावर आली नाही.

**१२.** एकंदरीतच अभिलेखावरील पुरावा पाहता अभियोगपक्षाची भिस्त फिर्यादी, वैद्यकिय अधिकारी व तपासीक अंमलदार यांच्या पुराव्यावर अवलंबुन असल्याचे दिसुन येत आहे. फिर्यादीच्या पुराव्याचे व फिर्याद नि.क्र.१९ चे अवलोकन केले असता त्यामध्ये अनेक विसंगती व काही तथ्य सुधारणा करुन सांगितले असल्याचे दिसुन येत आहे. फिर्यादी यांनी त्यांना मारहाण झाली त्यावेळी आजुबाजुच्या लोकांनी भांडण मिटवल्याचे कथन करुन

घटनास्थळ ठिकाणी गर्दी व लोकांची घरे असल्याचे मान्य केलेले आहे. यावरुन सदर ठिकाणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. आरोपींनी फिर्यादीस मारहाण केली ही बाब दर्शवण्यासाठी अभियोगपक्षातर्फे इतर कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही.

१३. फिर्यादीच्या कथनानुसार आरोपींनी त्यास काठी व दगड या हत्यारांनी मारहाण केलेली आहे. अभिलेखावरील पुरावा पाहता अभियोगपक्षातर्फे सदर काठी व दगड पुराव्याकामी सादर केलेला नाही. त्यामुळे याठिकाणी सदर गुन्ह्यातील हत्यारच पुराव्यामध्ये शाबित न झाल्याने सदर खटल्याबाबत रास्त संशय निर्माण होत आहे.

१४. अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यासाठी तपासलेल्या पंच साक्षीदाराने त्याच्या समक्ष पंचनामा झाल्याबाबत कोणतेही कथन केले नाही. पंचनामा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे दुस–या पंचाचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे तपासीक अंमलदार यांनी जरी घटनास्थळ पंचनामा केल्याचे कथन केले असले तरी सदर पंचनाम्यातील घटकांची योग्यरित्या शाबिती झाली असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादातील पंचनामा हा संपुर्णपणे संशयाच्या भोव–यात दिसुन येत आहे.

१५. अभियोगपक्षातर्फे फिर्यादीच्या कथनास दुजोरा देण्याकरिता फिर्यादीच्या कथनानुसार घटनेवेळी हजर असणा–या योगेश दातरे (सा.क्र.०४) यांचा पुरावा सादर केला आहे. परंतु, सदर साक्षीदाराने फिर्यादीच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये काय झाले हे त्यास माहित नसल्याचे कथन केले आहे. अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या समाधान पवार (सा.क्र.०६) व पौलाद पवार (सा.क्र.०७) यांनी देखिल फिर्यादीच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. सदर कारणास्तव या खटल्यामध्ये संशय निर्माण होत आहे.

१६. एकंदरीतच अभिलेखावरील पुरावा पाहता फिर्यादी यांच्या पुराव्यामध्ये अनेक विसंगती तसेच काही तथ्य सुधारणा करुन सांगितले असल्याचे व काही सांगण्यातुन वगळली असल्याचे दिसुन येत आहे. फिर्यादीच्या कथनास दुजोरा देण्याकरिता तपासलेल्या साक्षीदारांनी घटनेबाबत कोणतेही कथन केलेले नाही. पंच यांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा झाल्याबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही. त्यामुळे पंचनामा देखिल संशयाच्या भोव–यात दिसुन येत आहे. फिर्यादीस झालेलया कथित मारहाणीबाबत गुन्ह्यातील हत्यार म्हणजेच काठी व दगड पुराव्याकामी सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे गुन्ह्यातील हत्यार सिध्द झालेले नाही. तपासी अधिकारी यांचा पुरावा केवळ तपासापुरताच मर्यादित आहे. वर नमुद केल्याप्रमाणे सर्व त्रृटी सदर खटल्यामध्ये दिसुन येत असुन त्यामुळे या खटल्याबाबत संशय निर्माण होत आहे. फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपी विरुद्ध अपराध शंकेच्या पलिकडे जावून शाबीत करणेची सर्व जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. सदर गुन्हयामध्ये आरोपीविरुध्द सादर केलेल्या पुराव्यामध्ये संशय निर्माण झाला असुन त्याचा फायदा आरोपीस देणे न्यायोचित राहिल असे मला वाटते. सबब, वरील कारणास्तव मी, मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०४ करीता</u>–**

१७. मी मुद्दा क्र.०१ ते ०३ करिता नकारार्थी नष्कर्ष नोंदवलेला आहे. सबब, आरोपीला या खटल्यातुन पुराव्या अभावी निर्दोष मुक्त करणे न्यायोचित राहिल असे मला वाटते म्हणून मी मुद्दा क्र. ०४ तथा खटला न्यायनिर्णय कामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**०१.** आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ खालील गुन्हयांमधून निर्दोष मुक्त करण्यात येते.

०२. आरोपींचा जामीनकद्बा रद्द करुन त्यांना खुले करण्यात येते.

०३. सदर गुन्ह्यामध्ये जप्त असलेला दगड मुल्यहिन असल्याने अवाहन कालावधी संपल्यानंतर त्याचा नाश करण्यात यावा.

०४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकामी प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/–चा जामीनकद्बा दिलेला आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.05.05 15:57:23 +0530

**स्थळ : सटाणा.** **(चारुदत्त उध्दव शिपकुले)**

**दिनांक : ०५/०५/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा.**